**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत- युनायटेड किंगडम मुक्त व्यापार करार आजपासून लागू/ सर्व स्तरातून कराराचं स्वागत /मुंबईजवळच्या न्हावाशेवा बंदरातून निर्यातीची पहिली फेरी रवाना
- मुंबई शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयात राष्ट्रीय तपास यंत्रणेसाठी विशेष न्यायालयाची स्थापना
- मतदारसंघ पुनर्रचनेत सरसकट ५० टक्के वाढ असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार

**आणि**

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन पहिली आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरु

**<><><><><>**

भारत- युनायटेड किंगडम यांच्यातला मुक्त व्यापार करार आजपासून लागू झाला आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून यूकेमध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. ऐकूया याविषयीचा वृत्तांत...

**व्हीसी**

*('वर्धित व्यापार भागीदारी' आणि 'भारत-यूके रोडमॅप २०३०' ला मे २०२१ मध्ये मान्यता देऊन, दोन्ही देशांनी या कराराचा पाया घातला. या पथदर्शी आराखड्याच्या मदतीने २०३० पर्यंत परस्परांबरोबरचा व्यापार दुप्पट करून तो १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं. या कराराचं अनेक स्तरावर स्वागत होत आहे. भारत आणि यूकेमधला हा करार अंमलात आल्यामुळे दोन्ही देशांचे आर्थिक संबंध अधिक दृढ होणार असून यामुळे दोन्ही देशांच्या सामायिक उद्दिष्टांचं रुपांतर प्रत्यक्ष संधींमध्ये होणार आहे, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. भारतातल्या अनेक प्रगतशील क्षेत्रांना यूकेच्या बाजारपेठेत अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील, असंही ते म्हणाले. हा करार*

*व्यापार, गुंतवणूक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी नवीन संधींची दारं खुली करत असून तो विकसित भारत २०४७ या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला गती देईल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला आहे. कराराचा फायदा देशातल्या महिला, शेतकरी, युवा वर्ग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, नवोन्मेषक, व्यावसायिक आणि मच्छिमार यांना होईल आणि विविध क्षेत्रात संधी निर्माण होतील, असंही गोयल म्हणाले. आजपासून लागू झालेला हा भारत-यूके सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार भारताची आर्थिक वाढ आणि जागतिक भागीदारी बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याची प्रतिक्रिया संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली आहे. देशाचे आर्थिक हितसंबंध बळकट करण्याबरोबरच शेतकरी आणि कृषी क्षेत्राचं संरक्षण या करारामुळे होणार असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली आहे.*

*देशातल्या विविध उद्योग संघटनांनी या कराराचं स्वागत केलं आहे. हा करार जागतिक पुरवठा साखळीत भारताचा सहभाग वाढवण्यासाठी आणि नवोन्मेषावर आधारित विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास फिक्कीचे सरचिटणीस अनंत स्वरूप यांनी व्यक्त केला. या करारामुळे वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, सागरी उत्पादनं, रत्नं आणि दागिने, अभियांत्रिकी वस्तू आणि रसायनं यांसारख्या भारतीय क्षेत्रांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा  असोचॅम चे अध्यक्ष निर्मल कुमार मिंडा यांनी दिली आहे. तर या करारामुळे भारतीय निर्यातदारांना यूकेच्या बाजारपेठेत संधी तसंच समान स्पर्धात्मक वातावरण मिळेल, अशी प्रतिक्रिया ट्रेड प्रमोशन कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मोहित सिंगला यांनी दिली आहे.*

*हा करार आजपासून लागू झाल्याचं औचित्य साधून केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विविध कार्यक्रम  आयोजित केले आहेत. परदेश व्यापार महासंचालनालयानं आज मुंबईजवळच्या न्हावाशेवा बंदरात एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी रसायनं, औषधंनिर्माण सामग्री,*

*प्लास्टिक, खाद्यपदार्थ, एन्झाइन्म्स आणि मसाले इत्यादी मालाची पहिली फेरी रवाना झाली. पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथे नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात, या कराराअंतर्गत युकेमधे निर्यात होणाऱ्या रत्नं आणि आभूषणांची पहिली फेरी समारंभपूर्वक रवाना होईल. )*

**<><><><>**

शल्यचिकित्सेचे जनक आचार्य सुश्रुत यांच्या जयंती निमित्त आज दिल्ली इथं अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे 'सौश्रुतम् २०२६' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या परिसंवादाचं आज उद्घाटन झालं.त्या आपल्या भाषणात म्हणाल्या,

**…. होल्ड- बाईट- राष्ट्रपती**

या परिषदेत जगभरातील आयुर्वेदतज्ज्ञ आणि आधुनिक शल्यचिकित्सक विज्ञानाच्या एकात्मिक वापरावर सखोल चर्चा करणार आहेत. या परिषदेत राष्ट्रीय भारतीय वैद्यक आयोगाच्या अभ्यास अहवालाचं प्रकाशन करण्यात येणार असून, अत्याधुनिक एमआरआय सुविधेचंही उद्घाटन केलं जाणार आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय तपास यंत्रणेद्वारे महाराष्ट्रात तपास केल्या जाणाऱ्या गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी केंद्रीय गृह मंत्रालयानं एक विशेष न्यायालय स्थापन केलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि राज्य शासन यांच्याशी चर्चा केल्यानंतर मंत्रालयानं हा निर्णय घेतला. या संस्थेद्वारे तपासल्या जाणाऱ्या दहशतवाद आणि इतर अधिसूचित गुन्ह्यांच्या खटल्यांच्या जलदगती सुनावणीसाठी मुंबई इथल्या शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयात हे विशेष न्यायालय स्थापन केलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी पंजाबच्या दौऱ्यावर जाणार आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गंत पुनर्विकसीत केलेल्या जालंधर कँटोन्मेंट रेल्वे स्थानकाचं उद्घाटन ते करणार आहेत. याच योजनेअंतर्गंत देशातल्या विविध ठिकाणच्या ७४ रेल्वे स्थानकांचं उद्घाटनही दूरस्थ पद्धतीनं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते केलं जाईल.

अमृतसर ते वाराणसी दरम्यान सुरू होणाऱ्या संत रविदास एक्सप्रेस गाडीला प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवणार आहेत. याच दौऱ्यात प्रधानमंत्री चंदीगढ इथल्या पंजाब अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट देणार असून तिथल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन करतील.

**<><><><><>**

मतदारसंघ पुनर्रचना आणि घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे देशातल्या लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या जागांमध्ये सरसकट ५० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव असेल, तर आपला पक्ष या घटनादुरुस्तीला पाठिंबा देण्यास तयार आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज सांगितलं. सर्व राज्यांमधल्या जागा ५० टक्क्यानं वाढवल्यास महाराष्ट्रात लोकसभेच्या जागा ४८ वरून ७२, तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून १२० होतील. हा फॉर्म्युला अधिक व्यावहारिक वाटत असून, याबाबत पक्षाची अधिकृत भूमिका इंडिया आघाडीशी चर्चा करून आणि विधेयक हाती आल्यानंतर २४ तासांत स्पष्ट केली जाईल, असंही त्या म्हणाल्या. आपला पक्ष भाजपा किंवा राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चा या केवळ अफवा असल्याचं मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत त्या बोलत होत्या. तसा कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि आम्हीही कोणाशी संपर्क साधलेला नाही, असंही त्या म्हणाल्या.

केवळ लोकसंख्येच्या निकषावर पुनर्रचना केली तर दक्षिण भारतातल्या राज्यांवर अन्याय होण्याची भीती आहे, जी अगदी योग्य आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिली आंतरराष्ट्रीय विमान सेवा आजपासून यशस्वीपणे सुरू झाली. या विमानतळावरून एअर इंडिया एक्स्प्रेसचं बोईंग ७३७ मॅक्स ८ हे अत्याधुनिक विमान आज पहाटे अबू धाबीसाठी रवाना झालं. सुमारे शंभर प्रवासी असलेलं हे विमान अडीच तासांचा प्रवास करून सुरक्षितपणे उतरलं. नवी मुंबई विमानतळावरून पहिल्यांदाच नाशवंत वस्तूंची निर्यातही या विमानातूनत करण्यात आली. आठवड्यातून तीन वेळा विमान सेवा चालणार आहे.

**<><><><><>**

इराणने पुन्हा एकदा युद्धबंदीबाबत चर्चेसाठी पुढं यावं, अन्यथा त्यांच्याविरोधातील लष्करी कारवाई पुढील आठवड्यापासून अधिक कठोर होईल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका मुलाखतीमधून दिला आहे.

इराणवरील अमेरिकेचे हल्ले पुढील काही दिवस सुरू राहतील, गरज भासल्यास इराणमधील वीज प्रकल्प, पूल आणि अन्य महत्त्वाच्या ऊर्जा पायाभूत सुविधांनाही लक्ष्य केले जाऊ शकते, असंही ट्रम्प यांनी सांगितलं. यापूर्वी अमिरेकेनं इराणच्या खर्ग बेटावर हल्ला केला होता. मात्र, जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ नये म्हणून तिथल्या तेल सुविधा केंद्रांना लक्ष्य केलं नसल्याचा दावा ट्रम्प यांनी मुलाखतीतून केला. दरम्यान, इराणच्या तेल पायाभूत सुविधांवर हल्ल्याची शक्यता अद्याप कायम असली, तरी सध्या ती कमी असल्याचेही त्यांनी नमूद केले. होर्मुझ सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय जहाजवाहतुकीसाठी खुली असून इराणच्या जहाजांसाठी ही वाहतुकीसाठी बंद असल्याचा दावाही ट्रम्प यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी यांचे वडील आणि दिवंगत अमीर शेख- हमद बिन खलिफा अल थानी यांना श्रद्धांजली अर्पण केली. दोहा इथल्या भारतीय दूतावासानं समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीनं रिजिजू यांनी अमीर शेख तमीम बिन हमद थानी यांचं सांत्वन केलं.

**//<><><><><>//**